




दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहर/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.

दैनिक वादळ वार्ता

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

** पात्रता **

१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

संपर्क-९४२२६६००७७

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.



vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● बुधवार २० मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २१७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


## निवडणूक आयोगाच्या दणक्यानंतर सरकारला जाग

# प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या



**वादळ वार्ता / मुंबई**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या दणक्यानंतर राज्य सरकारला जाग आली आहे. राज्य सरकारने निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर लगेच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या केल्या आहेत. विशेष म्हणजे ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांचादेखील यामध्ये समावेश आहेत. तसेच मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, जळगाव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अंकित, बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी विशाल नरवाडे आणि धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकीरी शुभम गुप्ता, आएएस अधिकारी संजय मीना, अमित सैनी यांची तडकाफडकी बदली केल्याची माहिती समोर आली आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्यानंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पण या बदल्या निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर करण्यात आल्याची चर्चा आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुका योग्य पद्धतीने पार पडाव्यात म्हणून देशभरातील काही अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश दिले होते. निवडणूक आयोगाने नुकतंच देशभरातील विविध राज्यांना तीन वर्षांपेक्षा जास्त कार्यकाळ असणाऱ्या अधिकाऱ्यांचा किंवा गृह कॅडर असलेल्या अधिकाऱ्यांच्या तातडीने बदलीचे आदेश दिले होते. त्यानुसार विविध अधिकाऱ्यांची बदली करण्यात येत असल्याची माहिती समोर आली होती. विशेष म्हणजे नुकतंच निवडणूक आयोगाने मुंबई महापालिका आयुक्त इक्बाल सिंह यांना हटवण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आज महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्य सरकारने ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांची तडकाफडकी बदली केली आहे. त्यांना मुबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. तिथे सध्या पी. वेलरासू कार्यरत आहेत. तसेच मुंबई महापालिकेच्या दुसऱ्या विद्यमान अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमध्ये बदली करण्यात आली आहे. त्यांच्यावर मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे.

## नवगण राजुरी येथे श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**वादळवार्ता/नवगण राजुरी**

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी संत महात्म्यांच्या आशिर्वादाने आणि वै.रामबाबा सोनवणे (खांबेकर) यांच्या संकल्पनेतून साकार झालेला भव्य दिव्य सांप्रदायाची परंपरा लाभलेला जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त दि.२० ते २७ मार्च या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० गाथा पारायण, १० ते १२ जगद्गुरू संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी २ ते ४ संत तुकाराम महाराज चरित्र, सायंकाळी ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन होईल. यात विठ्ठल बहीर, दिपक जोशी, प्रमिलाताई ढेंगळे, रामानंद महाराज पुरी, रावसाहेब शेळके, आशाताई पोकळे, अशोक झुनगुरे यांचे प्रवचन तर ह.भ.प. गुरूवर्य महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र संस्थान नारायणगड, ह.भ.प.महंत रामेश्वर महाराज शास्त्री श्री क्षेत्र ब्रम्हनाथ संस्थान येळंब, ह.भ.प. महंत रामदास महाराज भारती, विनोदाचार्य ह.भ.प. शिवाजी महाराज येवले, ह.भ.प. अंगद महाराज काशिद, ह.भ.प. महंत स्वामी योगीराज महाराज श्री क्षेत्र संस्थान रामगड, ह.भ.प. युवा किर्तनकार अक्षय महाराज पिंगळे यांचे हरिकिर्तन होणार असून या सप्ताहाची सांगता बुधवार दि.२७ मार्च रोजी सकाळी भव्य दिव्य नगर प्रदक्षणा व नंतर १० ते १२. ह.भ.प. आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांचे जगद्गुरू संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळ्या निमित्त व बीजेच्या किर्तनाने होईल. त्यानंत महाप्रसाद होणार आहे. तरी या सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी नवगण राजुरी यांनी केले आहे.

## आदीबा फारुख शेख हिचा पाहिला रोजा



**कायगाव/प्रा संजय तुपे**

अमळनेर वस्ती (ता गंगापुर ) येथील इयत्ता तिसरी वर्गात शिक्षण घेत असलेली आदिबा फारूक शेख या चिमुकलीने वयाच्या ९ व्या वर्षी पवित्र रमजान महिन्यातील पहिला रोजा ठेवला आहे मंगळवारी ( ता १९) रोजी रोजा (उपवास )पुर्ण केला आहे. एवढ्या कडाक्याच्या उन्हाळ्यात रोजा ठेवल्या बदल वडील फारुक शेख आई परवीन शेख आजोबा दाऊद शेख आजी शेरिफा बी शेख आई आजी शेहनाज बी शेख चुलते हरुन शेख आनिस शेख फिरोज शेख आसिफ शेख व भाऊ सलिम मुस्तकीम साद जैद व मामा जमील इस्माईल पठाण आणि शाळेचे शिक्षक व गावकऱ्यांनी कौतुक अभिनंदन केले आहे.

## ज्ञानेश्वरी वाचकाला भेटवस्तू व काल्याचे किर्तनाने बालाजी महोत्सवाचा समारोप देसरडा परिवाराने महाप्रसाद व भेटवस्तू चे यजमानपद निभावले !

**वादळवार्ता/शिरूरकासार**

गेली सात दिवसापासुन सुरू असलेल्या बालाजी महोत्सवाचा मंगळवारी मोठ्या उत्साहात समारोप झाला या प्रसंगी सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे काल्याचे किर्तन होऊन दहिहंडी फोडण्यात आली ,सात दिवस ज्ञानेश्वरी पारायण करणा-या ग्रंथ वाचकास भेटवस्तू देण्याचे व महाप्रसादाचे यजमानपद येथील देसरडा परिवाराने निभावले . वै .गणेशानंद सरस्वतीजी व वै आबादेव महाराज यांचे प्रेरणेतून बावीस वर्षापासुन हा महोत्सव साजरा केला जातो ,प्रतेक वर्षी कथा ,किर्तन अशा वेगवेगळया धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन बालाजी तरूण युवक मंडळ करत असते याही वर्षी स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे



अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला . जवळपास पंचेचाळीस ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचकास भेटवस्तू व प्रवचनकार , टाळकरी ,मृदंग वादक ,गायक यांचाही यथोचित सत्कार केला .कांतीलाल देसरडा ,संतोष ,संजू देसरडा यांनी भेटवस्तू तर किरण व प्रकाश देसरडा यांनी महाप्रसादाची जबाबदारी निभावली . सिध्देश्वर संस्थानला धाकटी अलंकापुरीचे वैभव प्राप्त करून देण्यारे शास्त्रीजी यांचे हस्ते दहिहंडी फोडण्यात आली. किर्तन व महाप्रसादासाठी मोठ्या संखेने भाविक उपस्थित होते.


## लोकसभा निवडणूक

### अपक्ष लढणार, पण लोकसभा निवडणूक लढणारच:




लोकसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरु झाला आहे. अशात महाराष्ट्रात आघाडी आणि युतीच्या चर्चा सुरु आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीचं जागावाटप अद्याप जाहीर झालेलं नाही. अशात आता एका शेतकरी नेत्याने 'एकला चलो रे'ची भूमिका घेतल्याचं दिसतं आहे. लोकसभा निवडणूक लढण्याचा मानसही त्यांनी बोलून दाखवला आहे. अपक्ष लोकसभा निवडणूक लढण्याचा निर्णय घतोय. जनतेचा आग्रह आहे की मी निवडणूक लढवावी. मतदार संघात प्रचार सुरू केला आहे, असं शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी म्हटलं आहे. मात्र मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतरही शिवतारेंही अजित पवारांवर हल्ला चढवणं काही सोडलं नाही.

### प्रणिती शिंदे यांच्याविरोधात भाजपकडून दिग्गज उमेदवार



आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपकडून प्रत्येक मतदारसंघाची चाचपणी केली जात आहे. भाजपने महाराष्ट्रात 20 उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. पण अजूनही 28 मतदारसंघांच्या उमेदवारांची घोषणा होणं बाकी आहे. महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला अजून निश्चित झालेला नाही. पण तरीही भाजपने 20 उमेदवारांची नावे घोषित केली आहे. विशेष म्हणजे भाजप 30 पेक्षा जास्त जागांवर निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहे, अशी चर्चा आहे.

### माढा लोकसभा मतदारसंघात भाजपसाठी धोक्याची घंटा



आमचं ठरलंय म्हणत विजयसिंह मोहिते-पाटलांचे बंधू जयसिंह मोहिते-पाटलांचा व्हिडीओ व्हायरल झालाय. दुसरीकडे माढ्यातल्या उमेदवारीबाबत काय निर्णय घ्यायचा, हे दोन ते तीन दिवसात ठरवणार असल्याचं रामराजे निंबाळकरांनी म्हटलंय. माढ्यात मोहिते पाटलांचं जवळपास ठरल्याचं बोललं जातंय. मोहिते पाटलांचे बंधू बाळदादा मोहितेंचा व्हिडीओ व्हायरल होतोय. र्यशील मोहिते पाटील होते इच्छूक भाजपनं स्थानिक विरोधाला डावलून पुन्हा रणजितसिंह नाईक-निंबाळकरांना तिकीट दिल्यानं आमचं ठरलंय म्हणत बाळदादा मोहितेंचा व्हिडीओ व्हायरल झालाय. माढा लोकसभेत मोहितेंचे पुतणे धैर्यशील मोहिते पाटील भाजपकडून इच्छूक होते. त्यांनी अनेक दिवसांपासून त्याची तयारीही सुरु केली

## शेतकरी आत्महत्या हा देशापुढील सर्वात बिकट आणि मोठा प्रश्न-प्रा. शैला बरुरे

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

शेतकरी आत्महत्या हा देशापुढील सर्वात बिकट आणि मोठा प्रश्न आहे आणि हा प्रश्न सोडविण्यासाठी विविध राजकीय पक्ष, समाज, संवेदनशील वर्ग आणि शेतकरी या सर्वांनी एकत्रित येऊन प्रयत्न केले पाहिजेत असे मत शेतकरी आत्महत्यांच्या अभ्यासिका प्रा. शैला बरुरे यांनी व्यक्त केले.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या अन्नत्याग आंदोलन कार्यक्रमात किसान पुत्रांशी हितगुज साधतांना प्रा. शैला बरुरे बोलत होत्या. आपल्या विस्तारीत हितगुजात त्या पुढे म्हणाल्या की, शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढण्यासाठी निसर्ग, शेतकरी विरोधी कायदे, जागतिकीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न, शेतीच बिघडलेलं अर्थशास्त्र, शेतमालाचा आवश्यक वस्तू कायद्यात समावेश आणि इतर कारणं आहेत. या सर्व कारणांचा एकत्रित अभ्यास करून या कारणांचा शोध घेतला गेला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात बोलताना किसान पुत्र आंदोलनाचे नेते अमर हबीब यांनी शेतकरी आत्महत्यांची तीव्रता दिवसेंदिवस वाढत चालली आहे असे सांगून यावर्षी राज्यातील ३२ जिल्ह्यातील ठिकठिकाणी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या प्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन करण्यात आले ही जमेची बाजू असल्याचे सांगितले. शेतकरी हा असा घटक आहे की त्याला सर्व आपत्तींचा सामना करावा लागतो. या आंदोलनात शेतकरी पुत्रांना सहभाग कमी असतो ही वेदना देणारी गोष्ट असली तरी या आंदोलनातील वाढता सहभाग ही आंदोलनाच्या जमेची बाजू असल्याचे त्यांनी सांगितले. २०१७ पासून अन्नत्याग आंदोलन सुरु करण्यात आले असून या आंदोलनाला आता व्यापक स्वरूप मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक सुदर्शन रापतवार यांनी केले. यावेळी त्यांनी मागील सात वर्षांपासून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची माहिती



देत हे आंदोलन किसान पुत्राच्या व्यापक सहभागामुळे अधिक मोठ्या प्रमाणावर करण्यात येईल असे सांगितले. यावेळी अमर हबीब, कालिदास आपेट, वसंतराव मोरे, मुजीब काजी, अमृत महाजन, अविनाश मुडेगांवकर, अनिकेत डिघोळकर, गणेश कदम, प्रा. बाबुराव सावंत, ऍड. माणिकराव बावणे, अच्युत गंगणे, शेख इस्माईल, आशा हबीब, प्रा.अलका तालखेडकर, विजया पल्लेवार, वैजनाथ शेंगुळे, बालासाहेब कराड, वर्षा देशमुख, सोमेश्वर जाधव, प्रा. पंडीत कराड, प्रा. शैला बरुरे याच्यासह अनेक किसान पुत्र सहभागी झाले होते. सर्व विश्वस्तांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

## संपादकीय

### मूत्रपिंडाच्या आजार

जेव्हा मूत्रपिंडाची कार्यक्षमता कमी होते तेव्हा मूत्रपिंडाचा आजार होतो. मूत्रपिंडाच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाल्यास रक्तातील अनावश्यक घटक वाढू शकतात. उच्च रक्तदाब, मधुमेह, अनुवांशिक घटक आणि ठराविक संक्रमणामुळे मूत्रपिंडाचे आजार होऊ शकतात. काही औषधे मोठ्या डोसमध्ये किंवा दीर्घ कालावधीसाठी घेतल्यास मूत्रपिंडाचे नुकसान होऊ शकते. नियमित व्यायाम, वजन नियंत्रित राखणे, शरीर हायड्रेटेड राखणे आणि वेदनाशामक औषधांचा वापर टाळणे हे मूत्रपिंडाचा आजार होण्याचा धोका कमी करण्याचे सर्वोत्तम मार्ग आहेत. याबाबत डॉ. अमित लंगोटे यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

मूत्रपिंडाच्या आजाराची अशी लक्षणे ज्याकडे दुर्लक्ष करू नये

मूत्रपिंडास सूज येणे, एनोरेक्सिया आणि वजन कमी होणे तसेच हात, पाय, टाचा किंवा चेहऱ्यावर सूज येणे हे मूत्रपिंड योग्यरित्या कार्य करत नसल्याची लक्षणे आहेत. ॲनिमिया सारखी स्थिती जी लोहाची कमतरता दर्शवते, ज्यामुळे थकवा, अशक्तपणा सारखी लक्षणे दिसून येतात. एक सामान्य लक्षण म्हणजे मूत्रविसर्जन प्रक्रियेत होणारे बदल, जसे की वारंवार लघवीस जाणे किंवा लघवी करण्यास त्रास होणे.

संपूर्ण शरीरावर सतत खाज सुटणे याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. मूत्रपिंडाचे कार्य बिघडल्यामुळे रक्तामध्ये टाकाऊ पदार्थ तयार होतात तेव्हा अशी स्थिती उद्भवू शकते. उच्च रक्तदाब हे मूत्रपिंडाच्या आजाराचे कारण आणि लक्षण असू शकते, ज्यामुळे वेळीच निदान होण्यासाठी नियमित रक्तदाबाचे निरीक्षण करणे गरजेचे आहे. लघवीच्या रंगात बदल किंवा लघवीसा फेस येणे या असामान्य बदलांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.या सूक्ष्म लक्षणांबद्दल जागरुक राहणे आणि वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे आहे.

मूत्रपिंडाच्या आजाराचे निदान करताना, वेळीच निदान करणे आवश्यक आहे. रक्त चाचण्या, मूत्र चाचण्या आणि इमेजिंग चाचण्या मूत्रपिंडाच्या कार्याचे मूल्यांकन करतात आणि त्यासंबंधी विकृती ओळखतात. किडनीच्या आजारावर अत्याधुनिक एआय टेक्नोलॉजी फायदेशीर ठरत आहे. उपचारांच्या दृष्टीने, किडनीच्या आजाराचे मूळ कारण शोधणे महत्त्वाचे आहे. उच्च रक्तदाब नियंत्रित करणे, मधुमेह नियंत्रित करणे किंवा मूत्रपिंडास हानिकारक स्वयंप्रतिकार स्थितीचा शोध घेणे आवश्यक आहे.

जेव्हा मूत्रपिंडाची कार्यक्षमता कमी होते तेव्हा मूत्रपिंडाचा आजार होतो. मूत्रपिंडाच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाल्यास रक्तातील अनावश्यक घटक वाढू शकतात. उच्च रक्तदाब, मधुमेह, अनुवांशिक घटक आणि ठराविक संक्रमणामुळे मूत्रपिंडाचे आजार होऊ शकतात. काही औषधे मोठ्या डोसमध्ये किंवा दीर्घ कालावधीसाठी घेतल्यास मूत्रपिंडाचे नुकसान होऊ शकते. नियमित व्यायाम, वजन नियंत्रित राखणे, शरीर हायड्रेटेड राखणे आणि वेदनाशामक औषधांचा वापर टाळणे हे मूत्रपिंडाचा आजार होण्याचा धोका कमी करण्याचे सर्वोत्तम मार्ग आहेत. याबाबत डॉ. अमित लंगोटे यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

मूत्रपिंडाच्या आजाराची अशी लक्षणे ज्याकडे दुर्लक्ष करू नये

मूत्रपिंडास सूज येणे, एनोरेक्सिया आणि वजन कमी होणे तसेच हात, पाय, टाचा किंवा चेहऱ्यावर सूज येणे हे मूत्रपिंड योग्यरित्या कार्य करत नसल्याची लक्षणे आहेत. ॲनिमिया सारखी स्थिती जी लोहाची कमतरता दर्शवते, ज्यामुळे थकवा, अशक्तपणा सारखी लक्षणे दिसून येतात. एक सामान्य लक्षण म्हणजे मूत्रविसर्जन प्रक्रियेत होणारे बदल, जसे की वारंवार लघवीस जाणे किंवा लघवी करण्यास त्रास होणे.

संपूर्ण शरीरावर सतत खाज सुटणे याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. मूत्रपिंडाचे कार्य बिघडल्यामुळे रक्तामध्ये टाकाऊ पदार्थ तयार होतात तेव्हा अशी स्थिती उद्भवू शकते. उच्च रक्तदाब हे मूत्रपिंडाच्या आजाराचे कारण आणि लक्षण असू शकते, ज्यामुळे वेळीच निदान होण्यासाठी नियमित रक्तदाबाचे निरीक्षण करणे गरजेचे आहे. लघवीच्या रंगात बदल किंवा लघवीसा फेस येणे या असामान्य बदलांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.या सूक्ष्म लक्षणांबद्दल जागरुक राहणे आणि वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे आहे.

मूत्रपिंडाच्या आजाराचे निदान करताना, वेळीच निदान करणे आवश्यक आहे. रक्त चाचण्या, मूत्र चाचण्या आणि इमेजिंग चाचण्या मूत्रपिंडाच्या कार्याचे मूल्यांकन करतात आणि त्यासंबंधी विकृती ओळखतात. किडनीच्या आजारावर अत्याधुनिक एआय टेक्नोलॉजी फायदेशीर ठरत आहे. उपचारांच्या दृष्टीने, किडनीच्या आजाराचे मूळ कारण शोधणे महत्त्वाचे आहे. उच्च रक्तदाब नियंत्रित करणे, मधुमेह नियंत्रित करणे किंवा मूत्रपिंडास हानिकारक स्वयंप्रतिकार स्थितीचा शोध घेणे आवश्यक आहे.

# पोस्टमनची वाट: डोळे पांढरे फट्ट!

भारतीय टपाल सेवा ही भारतातील मध्यवर्ती सरकारच्या टपाल खात्यामार्फत- डिपार्टमेंट ऑफ पोस्ट्स ॲन्ड टेलिग्राफ्स- इंडिया पोस्ट या ब्रॅंडनावाने चालविली जाते. देशभर पसरलेल्या १ लाख ५५ हजार ३३३ टपाल कार्यालयामार्फत चालणारा इंडिया पोस्टचा कारभार हे जगातील या स्वरूपाचे सर्वात मोठे जाळे मानले जाते. देशाच्या दूरवरच्या आणि पोचायला अत्यंत अवघड भागातही पसरलेल्या या टपालसेवेच्या जाळ्यामार्फत अल्पबचत आणि इतर वित्तीय सेवाही चालविल्या जातात. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रही येथे मिळते. मात्र आज पत्र-पत्रिका, डाक पाहिजे तेथे पोहचविण्यात कमालीची दिरंगाई व हयगय केली जात आहे. पूर्वी अगदी कानाकोपऱ्यात जेथे प्रवासाचे कोणतेही साधन नसतानाही प्रामाणिकपणे हमखास पत्र-चिठ्ठी पोहोचविल्या जात होती. आज मात्र या सेवेने अशी सेवा पायदळी तुडविणे सुरू केले आहे, अशा बेईमान सेवेचा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखाद्वारे निषेध व्यक्त होत आहे... संपादक.

जबरदस्त सेवेचे श्रेय लाटण्याच्या हेतूने भारतीय टपाल कार्यालयाद्वारे दरवर्षी ९ ऑक्टोबर रोजी जागतिक टपाल दिन साजरा केला जातो. सध्याच्या टपाल व्यवस्थेची सुरुवात सतराव्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात झाली. सन १६८८मध्ये मुंबई आणि मद्रास इथे कंपनी पोस्टची कार्यालये स्थापन झाली. मात्र त्याद्वारे केवळ कंपनीच्या टपालाचीच ने-आण होई. वॉरन हेस्टिंग्ज हा बंगाल प्रांताचा गव्हर्नर असताना त्याच्याकडे मुंबई आणि मद्रास इलाख्याच्या देखरेखीचे अधिकार होते. त्याकाळात सन १७७४मध्ये टपालसेवा जनतेसाठी खुली करण्यात आली. पोस्टमास्टर जनरलची प्रथमच नियुक्ती करण्यात आली आणि टपालसेवेसाठी पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने टपालासोबत वापरायला सुरुवात झाली. सुरुवातीच्या काळातील अडचणींवर मात करण्यासाठी सर्व प्रेसिडेन्सीं अंतर्गतची टपाल सेवा एकसूत्री असावी, असा विचार पुढे आला. त्यातूनच पहिला भारतीय टपाल कायदा- १८३७ हा अस्तित्वात आला. त्यात पुढे बदल करून १८५४चा टपाल कायदा अस्तित्वात आला व त्याद्वारे देशात टपाल सेवेचा एकाधिकार हा टपाल खात्याला देण्यात आला. सन २०११पर्यंत त्यात बदल झालेला नाही. पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने मागे पडून दि.१ ऑक्टोबर १८५४ पासून चिकट पार्श्वभाग असलेली टपाल तिकिटे वापरात आली. आज समाजमाध्यमांची चलती असली तरी टपालसेवेवर सामान्य जनता अधिकच विश्वास ठेवून आहे, हे विशेष!

आजही बरेच लोक पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्र, लिफाफा खरेदी करून पत्र लिहून पाठवितात. संस्था, कंपनी, मुद्रणकार्यालय, मिशन आपल्या वाचकवर्गास साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, अर्धवार्षिक, वार्षिक पत्रिका तिकिटे चिकटवून पोस्टेड करतात. या सेवेचे पैसे त्या त्या पत्रप्रेषकांनी आधीच डाककार्यालयाला पेड केलेले असतात. तरीही त्या सेवेच्या-पत्र पोहोचविण्याच्या कामात टाळाटाळ केली जात आहे. दोन तीन वर्षांपासून एकही पत्र-पत्रिका वाटप करण्यात आली नाही. ज्यात धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, मनोरंजक, कृषी, वैज्ञानिक, कलाकौशल्य विषयक पुस्तकांचा- ग्रंथांचा समावेश असतो, हे नाईलाजास्तव सांगावे लागत आहे. आज पोस्टमन येईल, पत्रिका देईल, म्हणून रोज वाट पाहणारे डोळे शेवटी पांढरे फट्ट पडत आहेत, परंतु स्वारीचे नुसते दर्शन होणे, दुरापास्त झाले आहे. एखाद्याने विनोद म्हणून बैरंगपत्र पाठविले, तर ते पोचते करून पैसे उकळून नेले जात आहे. सही घेऊन पोचपावती न्यावयाची डाक- जसे आधार कार्ड, पॅन कार्ड, बॅंक पासबुक, एटीएम कार्ड, चेकबुक हे बरोबर वितरीत केले जातात. यावर हसावे की रडावे असे होत आहे. पूर्वी पत्रखर्च पेड केलेल्यांची गय करून इमानदारीने ते पत्र ईच्छित स्थळी लागलीच पोचते केले जात असे. त्यामानाने आज संबंधीत खात्यांतील कर्मचाऱ्यांचे पगार दसपटीने वाढले म्हणून की काय? असले हलके काम करण्याची लाज वाटत असावी किंवा सदर काम कमीपणाचे, अपमानास्पद नक्कीच वाटत असावे, असे आम्हास वाटते.

पूर्वी निरक्षर लोक पोस्टमनकडूनच पत्र वाचून घेत, त्यावेळी कोणतीच कुरबूर नसायची. आता मात्र खुपच बहाणे केले जात असल्याचे कळते. उदा. गावरस्ता, घर, गल्ली, वॉर्ड, आदी माहित नाही. पत्रिकांवर पूर्ण पत्त्यासह संपर्क क्र. अर्थात मोबाईल नंबर दिलेला असतो. कामाच्या व्यापामुळे, अतिव्यस्ततेमुळे, इतर अतिमहत्त्वाच्या कामामुळे पत्रिका पोहोचवू शकत नाही, म्हणून संबंधित व्यक्तीला आपल्या घरी किंवा पोस्टात बोलावून त्याची डाक त्याच्या स्वाधीन करण्याची साधी तसदीही का बरं घेतली जात नाही? गडचिरोली शहरात मासिक पत्रिका सुरू असलेले बरेच वाचक आहेत. असेच मागील फेब्रुवारी-२०२४मध्ये एकत्र येऊन यावर चर्चा केली. नेहमीच्या पत्रिका मिळणे बंद पडल्याने वाचनाची सवय सुटत चालल्याची खंत प्रत्येकांनीच व्यक्त केली. पोस्टाच्या या गलथान कारभारामुळे आपली वाचनसंस्कृतीही आता धोक्यात आली आहे, पोस्टखातेच वाचनसंस्कृतीला मारक ठरत असल्याचे खापर टपालसेवेवर फुटू लागले आहे. पत्रिका कार्यालयाकडे याबद्दल चौकशी केली असता त्यांनी ठराविक वेळीच तुमच्या पत्रिका नेहमीप्रमाणेच पोस्टेड केल्या आहेत, पोस्टात चौकशी करा, असे सांगत असतात. मग प्रत्येक वाचक पोस्टात येऊन खऱ्या-खोट्या सुनावत भांडण करून जावे का? पत्रपत्रिक पाठविण्याची सेवा-सुविधा चांगल्याप्रकारे इमाने इतबारे पोस्ट खात्याकडून पुरवली जावू शकत नाही, म्हणून सोडून देण्यास काय हरकत राहील? आजवरच्या एवढ्या मोठ्या पुस्तकांना, पत्रिकांना पोस्टाने बेमूर्वतपणे कचरापेटी दाखवली. पोस्टाच्या या निंदनीय कृत्याचा आज समस्त वाचकवर्ग या लेखातून तीव्र शब्दांत निषेध नोंदवत आहे. !! बेईमान पोस्टखाते, पत्रिकांना कचरापेटी देते !! निषेध, निषेध, निषेध !!

**संकलन तथा सुलेखन - केजीएन: श्री के.जी. निकोडे गुरूजी (से. नि. प्राथ. शिक्षक.) मु.पो.ता.गडचिरोली.**

## बारामतीत चंद्रकांत पाटलांनी केलेल्या टिकेला शरद पवार गटानं अजित पवारांचाच जुना व्हिडीओ शेअर करुन उत्तरं दिलंय.

बारामतीत विरोधक सोडा पण महायुतीतलेच अनेक नेते उपमुख्यमंत्री अजित पवारांना घेरु लागलेयत. बारामती लोकसभेत येणाऱ्या पुरंदरच्या शिंदेंच्या सेनेचे नेते विजय शिवतारेंनी दंड थोपटले आहेत. अजित पवारांचे पदाधिकारी दमदाटी करतात म्हणून इंदापूरचे हर्षवर्धन पाटील फडणवीसांकडे तक्रार करतायत. हर्षवर्धन पाटलांच्या कन्या अंकिता पाटील जर विधानसभेचा शब्द द्याल तरच लोकसभेत अजित पवारांना मतदान करु म्हणतायत. दौंडमधले भाजपचे आमदार राहुल कूल अद्याप सक्रीय झालेले नाहीत. त्यात बारामतीत जावून भाजपच्या चंद्रकांत पाटलांनी शरद पवारांचं महत्व अधोरेखित करुन अप्रत्यक्षपणे अजित पवारांना डिवचल्याचं बोललं जातंय. लोकसभेचं वारं सुरु झाल्यानंतर अजित पवारांनी सुरुवातीला शरद पवारांवर टीका केली. त्या टिकेला शरद पवारांच्या नेत्यांनी तोडीस तोड उत्तर दिलं. म्हणून नंतर शरद पवारांवरची टीका आपल्यावर बूमरॅंग होऊ नये म्हणून अजित पवारांनी एक पत्रक काढत यापुढे ज्येष्ठांवर टीका करणार नसल्याचं सांगितलं. तेव्हापासून अजित पवारांनी थेट शरद पवारांवर टीका केली नाही. मात्र काल चंद्रकांत पाटलांनी आम्हाला फक्त शरद पवारांचा पराभव हवा आहे, असं म्हणत अजित पवारांच्या विरोधकांना मुद्दा दिलाय.चंद्रकांत पाटलांच्या या विधानावरुन शरद पवार गटाचे प्रशांत जगतापांनी अजित पवारांचाच व्हिडीओ ट्विट करुन चंद्रकांत पाटलांना उत्तर दिलंय. चंद्रकांत पाटलांच्या टिकेवेळी रुपाली चाकणकरांच्या हास्यमुद्रेवरुनही राष्ट्रवादीच्या इन्स्टा खात्यावरुन त्यांचाही व्हिडीओ व्हायरल झालाय. अजितदादा म्हणतायत की आम्ही विकासासाठी भाजपात गेलो., मात्र अजित पवार सत्तेत आल्यानंतर त्यांच्याशी राजकीय मैत्री केल्याचं फडणवीसांनी म्हटलं होतं. काल चंद्रकांत पाटलांनी त्याच राजकीय मैत्रीला पुष्ठी करणारी आकडेवारी सांगितली. अजित पवार भाजपसोबत गेल्याच्या नंतर भिवंडीत भाजपचा कार्यक्रम झाला होता. त्यात कुणाचंही नाव न घेता महाविजयाकरिता कडू औषध घेण्याची तयारी ठेवा असं फडणवीसांनी म्हटलं होतं. काही दिवसांपूर्वीच अजित पवारांचं कौतूक करणारे विजय शिवतारेंनी अचानक अजित पवारांविरोधात भूमिका का घेतली. हर्षवर्धन पाटलांनी फडणवीसांना लिहिलेलं पत्र माध्यमांमध्ये सार्वजनिक का केलं. असे अनेक प्रश्न बारामतीत चर्चेत आहेत.विशेष म्हणजे काल शिवतारेंनी अजित पवारांवर जहरी टीका केली. मात्र अजितदादा गटाचे काही प्रवक्ते सोडल्यास धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, छगन भुजबळ सारख्या बड्या नेत्यांपैकी काही नेते मौन तर काहींनी मवाळ प्रतिक्रिया दिल्या आहेत.

बारामतीची लढाई अजित पवार विरुद्ध शरद पवारांमध्ये आहेच. मात्र महायुतीतही हा सुप्त संघर्ष सुरु नाहीय ना. या प्रश्नाकडेही गेल्या काही दिवसातल्या घडामोडी बोट दाखवतायत.

# लहाण मुलांच्या हातात मोबाईल ऐवजी ज्ञानेश्वरी ग्रंथ द्या हो-शिवांजली महाराज जरांगे

**वादळवार्ता/शिरूरकासार**

सध्या सर्रास माता वर्गाकडून लहाण मुलांना मोबाईल हातात देऊन त्याला नादी लावण्याचा प्रयत्न करतात मात्र लहाणपणी मोबाईलच्या आहारी जाणे ही आरोग्याच्या व संस्काराच्या बाबतीत धोक्याची नांदी ठरते ही गोष्ट लक्षात ठेऊन सध्या लहाण मुलाच्या हातात मोबाईल देण्याऐवजी विश्वमाऊली संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी हातात देण्याचा प्रयत्न करावा , ज्ञानेश्वरीचे ज्ञान त्याला भविष्यात उर्ध्वगतीला नेल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन मातोरी येथील युवा भागवताचार्या शिवांजली जरांगे या शिरूर कासार येथील २२व्या बालाजी महोत्सवात सातव्या



किर्तना प्रसंगी बोलत होत्या . वै.गणेशानंद सरस्वतीजी महाराज व वै.आबादेव महाराज यांचे प्रेरणेतून व धाकटी अलंकापुरी सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे अध्यक्षतेखाली २२ वा बालाजी महोत्सव सुरू आहे ,यामध्ये सातव्या जागरचे किर्तन कु.जरांगेताई यांचे किर्तन झाले ,सांप्रदायाच्या नियमाप्रमाणे देवा माझे मन लागो तुझे चरणी । संसार व्यसनी पडो नेदी || या मागणीपर अभंगावर बोलतांना संसाराचे व्यसन हे परमार्थाला विसर पाडण्यास कारणीभुत ठरते ,संसार दुःखाचे मुळ कारण आहे हे अनुभवातून वारंवार संतानी सांगितले असले तरी त्याचा आपणास विसर पडतोय ,संसार करत असतांना नामस्मरण करणे हा सोपा उपाय संतानी सांगितला , अनेक दाखले देऊन जरांगे ताईंनी मनावर कसा अंकुष ठेवावा हे सांगितले आणि संसार व्यसन अंगी जडू नये यासाठी देवाकडेच प्रार्थना करावी ,पायी तिर्थयात्रा मुखी रामनाम हाच नियम सिध्दिला जाण्याची देखील मागणे परमेश्वराकडेच करावी असे सांगितले. यावेळी बालाजी महोत्सवाचे आयोजकासह मोठ्या संखेने भाविक किर्तनासाठी उपस्थित होते मृदंग साथिला लहू देवकर व गायक श्रीक्षेत्र भगवान गडाचे संगित अध्यापक ईंद्रभान खेडकर गुरूजी , भाऊसाहेब ईंगोले सह टाळकरी उपस्थित होते .

# निर्णायक महाबैठकीस लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे!

## आपल्या लेकरांच्या हक्कासाठी यायलाच लागतंय - रोहन गलांडे

**वादळवार्ता/केज**

विस्वाघातकी सरकार सगेसोयरे कायदाची अंमलबजावणी करत नाही व आचारसंहिता लागू करून मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन मोडकळीस आणण्यासाठी निचपनाचा कळस असलेले सरकार कट रचत आहे त्यामुळे मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाची पुढील महत्वाची भुमिका ठरविण्यासाठी निर्णायक महाबैठक आपल्या लेकरांच्या न्याय हक्कासाठी रविवार दि. २४ मार्च २०२४ रोजी ठिक सकाळी ११ वा. ठेवली आहे तरी बीड जिल्ह्यातील सकल मराठा समाज बांधवांनी आपल्या प्रत्येक गावातुन कमीत कमी दोन गाड्या जिप,पीकप, स्कारपीओ आशा चार



चाकी दोन गाड्या तरी घेऊन निर्णय महाबैठकीस उपस्थित रहावे व आपली काळजी घेण्यासाठी उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याची सोय आपल्या गाडी सोबत करायची आहे व लाखोंच्या संख्येने निर्णय महाबैठकीस लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते रोहन गलांडे पाटील यांनी केली आहे . बैठकीचे ठिकान ठिकाण आंतरवाली सराटी ता. अंबड जि. जालना आहे तसेच बाहेर जिल्ह्यातुन येणाऱ्या मराठा बांधवाने २३ मार्च ला अंतरवाली सराटी येथे मुक्कामी उपस्थित रहावे असे ही रोहन गलांडे यांनी म्हटले आहे त्यांच अनुषंगाने अंतरवाली सराटी येथे मुक्कामी येणाऱ्या सर्व समाज बांधवांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था केलेली आहे .तरी बीड जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील आमरण उपोषणकर्ते, साखळी उपोषणकर्ते, मराठा सेवक, स्वयंसेवक, सभा आयोजक-नियोजक, डॉक्टर, वकील, अभ्यासक, शेतकरी, कष्टकरी आणि सर्व मराठा बांधव, याची महत्वाची बैठक बोलवण्यात आली तरी सर्व समाज बांधवांनी या बैठकीला स्वतःहुन लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते रोहन गलांडे यांनी केले आहे.

# हा वर्षामध्ये खा. प्रीतमताई मुंडे यांनी माळी समाजाला काय दिले?- संतोष रासवे





माजलगाव / प्रतिनिधी

ओबीसी समाजाचे आरक्षण वाचण्यासाठी जीवाची बाजी लावणाऱ्या माळी समाजाला गेल्या दहा वर्षापासून प्रीतमताई मुंडे बीड जिल्ह्याच्या खासदार असताना देखील कधीच माळी समाजाच्या आंदोलनाची दखल घेतली नाही. माळी समाज आपल्या सोबत आहे, असे गृहीत धरून हवेत वावरणाऱ्या खा. प्रीतमताई मुंडे यांनी कितीही माळी समाजाला विनवणी केली तरीही या लोकसभेला माळी समाज पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात मतदान करणार असल्याचे माळी समाजाचे नेते संतोष रासवे यांनी सांगितले आहे. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात संतोष रासवे यांनी म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील ओबीसीच्या नेत्या पंकजाताई मुंडे या स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या वारसदार असल्यामुळे माळी समाजाने भरपूर प्रेम केले. गेल्या दोन लोकसभेला प्रीतमताई मुंडे यांना विजयी करण्यामध्ये माळी समाजाचे मोठे योगदान आहे. मात्र गेल्या दहा वर्षात बीड जिल्ह्याच्या खा. प्रीतमताई मुंडे यांनी माळी समाजाच्या विविध मागण्यांवर कसलेच लक्ष दिले नसल्याने माळी समाजामध्ये खा. प्रीतमताई मुंडे यांच्या विरोधात भयानक असंतोष निर्माण झालेला आहे. माळी समाजाचे नेते ॲड. सुभाष राऊत यांच्या हॉटेलचे मराठा आरक्षणाच्या मागणीदरम्यान अतोनात नुकसान करण्यात आले. त्यांच्या घरावर देखील हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. मात्र याबद्दल प्रीतमताई असो किंवा पंकजाताई यांनी कसलाही आवाज उठवला नाही. रात्रंदिवस ओबीसी समाजासाठी जगणाऱ्या ॲड. सुभाष राऊत यांच्यासारख्या कार्यकर्त्याला धीर देण्याचे काम देखील या मुंडे परिवाराच्या वतीने करण्यात आले नाही. यामुळे ओबीसी समाजामध्ये पंकजाताई आणि प्रीतमताई मुंडे यांच्या विरोधात प्रचंड संताप निर्माण झालेला आहे. विशेष म्हणजे गेल्या दहा वर्षाच्या खासदारकीच्या कार्यकाळात प्रीतमताई मुंडे यांनी माळी समाजाला गृहीत धरल्याने माळी समाजाचे आराध्य दैवत श्री संत सावता महाराजांच्या बीड जिल्ह्यातील एकाही मंदिराला निधी दिला नाही, माळी समाजासाठी कोणतीही योजना कार्यान्वित केली नाही. आता यावर्षीच्या लोकसभा निवडणुकीत माळी समाज आपला असंतोष दाखवून देणार असल्याचे संतोष रासवे यांनी सांगितले आहे.

# टीका स्वीकारायला शिका, त्यातून माणूस सुधारणा घडवून आणतो-दिलीप पाटील

## मोहिते महाविद्यालयात रंगली राष्ट्रीय संशोधन

**पालघर/सौरभ कामडी**

खोडाळा : टीका स्वीकारायला शिका, त्यातून माणूस सुधारणा घडवून आणतो असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठातील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे माजी संचालक डॉ दिलीप पाटील यांनी केले. तसेच आजच्या काळात जो म्हणतो नोकरी मिळत नाही असा माणूस आळशी म्हटला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. मुंबई विद्यापीठातील ग्रामीण विकास अभ्यास मंडळाच्या वतीने गिरीवासी सेवा मंडळ, कल्याण संचलित मुरलीधर नानाजी मोहिते गुरुजी कला, वाणिज्य व बीएमएस महाविद्यालय खोडाळा - जोगलवाडी आणि बी.एल. अमलानी वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने डायनॉमिक्स ऑफ रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया राष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते; त्या प्रसंगी ते बोलत होते. आदिवासी व ग्रामीण भागातील संशोधकांना नवनवी संशोधने करून समाजाच्या हितासाठी उपयोगी व्हावे या उद्देशाने नवीन संशोधकांना संशोधन करण्यासाठी प्लॅटफॉर्म मिळावा म्हणून ग्रामीण विकास विषय



आधारभूत ठेऊन संशोधन करण्याचे आवाहन दोन्ही महाविद्यालयाकडून करण्यात आले होते. या राष्ट्रीय संशोधन परिषदेसाठी ग्रामीण विकासातील विषयांवर शोध निबंध सादर करण्यासाठी विषय देण्यात आले होते. या परिषदेत ग्रामीण विकासात स्वयं साह्ययता चळवळींचे योगदान, आदी. विषयांवर नवं संशोधकांनी परिषेदेत शोध निबंधाचा अभ्यास करून निष्कर्ष आपल्या अभ्यासातून काढण्यात आला. उन्नत भारत अभियानाचे उद्दिष्ट उच्च शिक्षण संस्थांना ग्रामीण भारतातील लोकांसोबत विकासाची आव्हाने ओळखण्यासाठी आणि शाश्वत विकासाला गती देण्यासाठी योग्य उपाय विकसित करण्यासाठी सक्षम बनवणे आहे. उन्नत भारत अभियान केंद्र सरकारची योजना असून त्या थीमवर महाविद्यालयात परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय संशोधन परिषदेत तब्बल चाळीस संशोधकांनी शोध निबंध सादर करून त्यावर चर्चा या परिषदेत करण्यात आली. नवं संशोधकांनी संशोधनाचा आधार घेऊन ग्रामीण भागातील समस्या व अडचणींना सरकारच्या निदर्शनास आणून देण्याची भूमिका बजवावी असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अनिल पाटील यांनी केले. तसेच शोध निबंध सादर करण्यासाठी संधी मिळणे गरजेचे असून आमचे महाविद्यालय ती संधी उपलब्ध करून देत आहे. त्यातून नवं संशोधकांनी संशोधन पद्धती अंगीकारावी असे मत गिरीवासी सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ चंद्रमणी मोहिते यांनी व्यक्त केले. यावेळी परिषदेचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. यशवंत शिद यांनी केले. याप्रसंगी परिषदेचे समन्वयक डॉ. जितेंद्र अहेरकर, प्रा. अरुण माळी, प्रा. सुनील गवरे, प्रा. दीपक कडलग, प्रा. माधुरी अहिरे, प्रा. तुकाराम रोकडे, प्रा. नवनाथ शिंगवे, प्रा. संतोष फुफाणे, प्रा. रघुनाथ मोरे, प्रा. प्रवर्तन काशीद आदी उपस्थित होते.

# चौसाळा येथिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविणार-विवेक कुचेकर

**वादळवार्ता/बीड**

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जंयती निमित्त बीड तालुक्यातील चौसाळा येथे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहीती सार्वजनिक जंयती उत्सव समितीचे आयोजक विवेक कुचेकर यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. दि,१४ एप्रील रोजी छत्रपती शाहुनगर याठिकाणी पंचशिल ध्वाजाचे अन्वारण होणार असुन दि,२५ एप्रील २०२४ रोजी गोरगरीब विदयार्थी शिक्षणासाठी दत्तक घेतले जाणार आहेत तसेच दि,२६ एप्रील रोजी वृध्दआश्रमात फळे वाटप करण्यात येणार आहेत दि,२७ एप्रील रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे तसेच ३० एप्रील रोजी छत्रपती शाहु नगर ते भीम नगर भव्य मिरवणुकीचे आयोजन केले असल्याची माहीती सार्वजनिक भीम



जंयतीचे आयोजक विवेक कुचेकर,प्रदीप चव्हाण,पवन कुचेकर,प्रदीप ईंगोले,मिंलीद सोनवणे,आमोल जावळे,अजय ईंगोले,विकी ढोकणे,स्वपनील सोनवणे, कृष्णा चव्हाण,राज सोनवणे,वैभव सोनवणे, तोफेक पठाण,शंकर सोनवणे,दादा गायकवाड,साहेद पठाण,दत्ता साळवे,बाबु ढोकणे,आदेश बोबडे,बाळु कांबळे,रवि सोनवणे,प्रताप सांळुके,प्रेम तुपारे,कपिल मस्के,साहील सोनवणे,गणेश सोनवणे यांनी दिली आहे.

# कास्ट्रईब कर्मचा-यांच्या मुलाची गगण भरारी पात्र उमेदुवारांचा गोरव

**वादळवार्ता/शिरूरकासार**

विविध पदावर उत्तीर्ण होऊन अधिकारी पदावर पात्र ठरलेल्या उमेदवारांचा शनिवारी १६ रोजी कस्ट्रईब जनरल महासंघाकडून गौरव करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक गट शिक्षण अधिकारी भगवान सोनवणे तर प्रमुख पाहुणे म्हणून अड अजय तांदळे पोलीस उपनिरीक्षक मधुकर ढाकणे संघटनेचे राज्याध्यक्ष अनिल जाधवर कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक अभिजीत तांदळे सर यांची उपस्थिती होती

कास्ट्राईब जनरल कल्याण महासंघाकडून कडून सातत्याने राज्यात कर्मचाऱ्यांच्या प्रश्न सोबत विद्यार्थ्यांना पाठबळ देण्यासाठी नक्की उपक्रम राबविण्यात येत असतात विविध स्पर्धा परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून यात अनेक विद्यार्थ्यांनी खरोखर परीश्रम घेऊन गौरव संपादन केले आहे बीड शहरातील अनेक विद्यार्थी या परीक्षेत चांगल्या गुणांनी





उत्तीर्ण झाले असून त्यांना लवकरच अधिकारी पदाचा दर्जा मिळणार आहे अशा उमेदवारांच्या शनिवारी कास्टाईब जनरल महासंघाकडून गौरव करण्यात आला यामध्ये संग्राम श्रीराम आघाव एसटीआय वर्ग २ मुसा शेख वक्त बोर्ड वर्ग दोन करण कुमार सूर्यकांत जोगदंड आरोग्य निरीक्षक भाग्यश्री विष्णू मिसाळ जिल्हा परिषद पदवीधर शिक्षक यांचा समावेश होता यातील उमेदवार कास्ट्राईब संघटनेतील कर्मचाऱ्यांचे पाल्य आहेत दरम्यान जिल्हा न्यायालयातील शासकीय अभियोग्यता ऍडव्होकेट अजय राख यांना भारत सरकारचा नोटरीपदी नियुक्ती मिळाल्यानंतर संघटनेच्या वतीने त्यांचाही सन्मान करण्यात आला कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवींद्र सुतार सुभाष जगताप प्रकाश अहिरे मुसा शेख बाळासाहेब शिरसाठ अर्जुन बारगजे भगीरथ मस्के भाऊसाहेब हंगे सूर्यकांत जोगदंड पद्मनाथ गरजे ज्ञानदेव वाघमारे बाळासाहेब शिरसाठ भागवत सोनवणे सुग्रीव तावरे कल्याण बावस्कर द ल वारे मणियार हकीम स्वामी ढेकणे प्रवीण सानप सोमनाथ तांदळे सूर्यकांत शिंदे अनिल गोल्हार विष्णू मिसाळ संजय दराडे प्रभाकर आंधळे भागवत संतोष रंधवे राजू दहिफळे प्रशांत गाडेकर यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविन सानप तर आभार द ल वारे यानी मानले

महिला आघाडीचाही सन्मान

कस्ट्रार्डबच्या महिला आघाडी यामध्ये महिलांचाही सन्मान करण्यात आला यामध्ये महिला आघाडीच्या जयश्री बडे अश्विनी कानडे यांचे महिला दिनानिमित्त जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
वादळ वार्ता

## अनिल तुरुकमारे यांचा जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी केला सत्कार



वादळवार्ता/बीड महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य माजी कॅबिनेट मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी शाल पुष्पगुच्छ देऊन पी आर पी चे जिल्हाध्यक्ष तथा समाजसेवक अनिल तुरूकमारे याचा बीड येथील कार्यालयात सत्कार केला.यावेळी प्रा.सनी वाघमारे ,पीआरपी शहराध्यक्ष शेख फिरोज,शहर उपाध्यक्ष शेख निसार ,श्रीरंग वाघमारे, फैज मोहम्मद खान उर्फ पापा भाई,मोहोजिब अब्दुल,सलीम इनामदार शेख माजिद, मनोज मस्के इत्यादी उपस्थित होते.

# मनसेचं इंजिन महायुतीच्या ट्रॅकवर, मनसेला दोन जागा मिळणार?

महायुतीत नवे ठाकरे येतील हे आता निश्चित झालंय. मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी दिल्लीत अमित शाहांच्या निवासस्थानी भेट घेतली. अमित शाह आणि राज ठाकरेंमध्ये अर्धा तास चर्चा झाली. याच भेटीत महायुतीत मनसेचा समावेश आणि जागा वाटपावरुन चर्चा झालीय. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मनसेला महायुतीत 2 जागा मिळू शकतात. दक्षिण मुंबई आणि नाशिक किंवा शिर्डीपैकी एक.. अशा 2 जागांवर चर्चा झाल्याचं कळतंय. अमित शाहांनी राज ठाकरेंना, 1-2 दिवसांत फडणवीसांसोबत बैठक करुन जागा वाटप आणि महायुतीत येण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असं सांगितलंय आता ज्या 2 जागा मनसेला मिळू शकतात त्याचं विश्लेषणही जरा समजून घेवूया. दक्षिण मुंबईतून बाळा नांदगावकरांना महायुतीत मनसेकडून उमेदवारी मिळू शकते सध्या दक्षिण मुंबईतून ठाकरेंच्या शिवसेनेकडून अरविंद सावंत तिसऱ्यांदा खासदारकीसाठी मैदानात आहेत. दक्षिण मुंबईतल्या लालबाग परळ भागात बाळा नांदगावकरांचा चांगला प्रभाव आहे. दक्षिण मुंबईत भाजपच्या मतांची संख्याही मोठी असून शिवसेनेतल्या फुटीमुळं नांदगावकर विजयी होऊ शकतात अशी भाजपच्या गोटात चर्चा आहे.

दुसरी जागा आहे...नाशिक किंवा



शिर्डी...नाशिकमध्ये मनसेचा चांगला प्रभाव आहे. नाशिक महापालिकेत मनसेची सत्ताही होती आणि महापौरही होता. 2009मध्ये नाशिकमध्ये वसंत मोरे, नितीन भोसले आणि उत्तमराव ढिकले हे 3 आमदार निवडून आले होते. सध्या नाशिकमधून शिंदेंच्या शिवसेनेचे हेमंत गोडसे खासादार आहेत पण इथं भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीनंही दावा केला. आता मनसे सोबत आल्यास नाशिकची जागा मनसेलाच मिळण्याची शक्यता आहे दिल्लीत राज ठाकरेंच्या दौऱ्यात त्यांचे अमित ठाकरेच सोबत होते...ऐरव्ही कायम सोबत असणारे बाळा नांदगावकरही राज ठाकरेंच्या दिल्ली दौऱ्यात नव्हते. सोमवारी रात्रीच राज ठाकरे दिल्लीत दाखल झाले..रात्री त्यांचा मुक्काम ताज मानसिंग हॉटेलमध्ये होता. हॉटेलमध्ये येताच महायुती किंवा अमित शाहांच्या भेटीवरुन राज ठाकरे थेट बोलले नाही. आपल्याला फक्त या ऐवढंच सांगितल्याचं मिश्लिकपणे राज ठाकरे म्हणालेत.राज ठाकरे सोबत महायुतीत चौथ्या पक्षाची एंट्री होईल..आणि राज ठाकरेंचा फायदा होईल असं दादांचे मंत्री भुजबळ म्हणतायत.. तर राऊतांनी काही फरक पडणार नसल्याचं सांगून राज ठाकरेंना इग्नोर केलं. अमित शाहांसोबतच्या भेटीनंतर अमित ठाकरेंनी फेसबुकवरुन पोस्ट करुन ग्रेट भेट म्हटलंय. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष सन्माननीय श्री. राजसाहेब ठाकरे यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री श्री. अमित शाह साहेब यांची भेट घेतली. मलाही या ग्रेट-भेटीचा साक्षीदार होता आलं.

याआधी 2019 मध्ये राज ठाकरेंनी दिल्लीत सोनिया गांधींची भेट घेतली होती. आता राज ठाकरे दिल्लीत अमित शाहांच्या भेटीला आले. 2019च्या लोकसभेत राज ठाकरेंनी मोदी शाहांना विरोध करत भाजपच्या विरोधात प्रचारसभा घेतल्या होत्या. लोकसभेच्या निकालानंतर त्यांनी EVMच्या विरोधात राज ठाकरेंनी भूमिका घेत दिल्लीत निवडणूक आयुक्तांसमोर म्हणणं मांडलं होतं. त्याचवेळी आयुक्तांच्या भेटीनंतर राज ठाकरे सोनिया गांधींच्या भेटीला आले होते. राजकारणात आणि तेही महाराष्ट्राबद्दल कधी काय होईल सांगता येत नाही. युती आणि आघाडीचं समीकरण लोकसभेची निवडणूक झाल्यावरही सुरुच आहे.

## लिंबागणेशकरांचे शेतकरी आत्महत्यांप्रती सहवेदनेसाठी अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

**वादळवार्ता**

लिंबागणेश:- देशभरातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या मार्गदर्शनात किसानपुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१९ मार्च मंगळवार रोजी सकाळी १० वा.पासुन सायं.४ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयासमोर एकदिवसीय" अन्नदात्यासाठी अन्नत्याग "आंदोलन करण्यात येत असुन तसे निवेदन ईमेल द्वारे जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले आहे.

शेतकरी आत्महत्या राष्ट्रीय आपत्ती ,नरभक्षी शेतकरी विरोधी कायदे रद्द करा :- अमर हबीब (किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते) शेतकरी आत्महत्या ही राष्ट्रीय आपत्ती असुन अस्मानी व सुलतानी संकटामुळे होणा-या आत्महत्येचे मुळ शेतकरी विरोधी नरभक्षी कायद्यात असुन शेतक-यांच्या आत्महत्येस खालील ३ प्रमुख शेतकरी विरोधी कायदे जबाबदार आहेत.

१) कमाल शेत जमीन धारणा कायदा २) भुमी अधिग्रहण कायदा ३)आवश्यक वस्तु कायदा हे जाचक ठरलेले ३ कायदे रद्द करण्यात यावेत.

साहेबराव करपे स्मृतिदिनानिमित्त २०१७ पासुन "अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलन "

दि.१९ मार्च १९८६ रोजी चिलगव्हाण जि.यवतमाळ येथील शेतकरी साहेबराव करपे यांनी शासनाची शेतकरी विरोधी धोरणे व त्यातून शेती व्यवसायात येणारे अपयश हेच सामुहिक मरणकांडाचे मुख्य सुत्र होते.

## रासेयो विद्यार्थ्यांची आनंदग्राम ला भेट.

### विद्यार्थ्यांना लाभले श्री. दत्ता बारगजे व डॉ. महेश गोलेकर यांचे विशेष मार्गदर्शन

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड ( प्रतिनिधी )**



तालुक्यातील मंझरी येथे आदर्श शिक्षण संस्थेच्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने व आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक च्या सौजन्याने दि. ११ मार्च पासून रासेयो शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराप्रसंगी बीड येथील पाली गावाजवळ टेकडीवर 'इन्फंट इंडिया –आनंदग्राम' नावाची संस्था असून यामध्ये एचआयव्ही एड्सग्रस्त अनाथ बालकांचा सांभाळ श्रीयुत दत्ता बारगजे व संध्या बारगजे हे गेली अनेक वर्षांपासून करतात. यावेळी डॉ. महेश गोलेकर व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गणेश पांगरकर यांनी शिबिरार्थी विद्यार्थ्यांना घेऊन या प्रकल्पाला भेट देत संपूर्ण प्रकल्पाची माहिती याप्रसंगी घेतली. यावेळी श्री. दत्ता बारगजे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व संपूर्ण प्रकल्पाची माहिती दिली त्यांच्या या कार्याचा आढावा पाहता सर्व विद्यार्थी प्रभावित होऊन काहींच्या डोळ्यात याप्रसंगी अश्रू अनावर झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी तेथील निवासी बालकांसोबत संवादही साधण्यात आला. इन्फंट इंडिया आनंदग्राम हा प्रकल्प आज नावारुपास येत असून याची दखल या अगोदर राज्यपातळीवर होत होती, परंतु आता जागतिक दर्जावर देखील या प्रकल्पाचे कौतुक होत आहे. तसेच या प्रकल्पासाठी मदतीसाठी ( युएसए ) सह अनेकांचे हात आज सरसावताना दिसत आहेत. या कार्यासाठी श्री. दत्ता बारगजे, पत्नी सौ.संध्या बारगजे, मुलगा डॉ. पृथ्वीराज बारगजे व स्नुषा डॉ. जागृती बारगजे यांनी या कार्यामध्ये स्वतःला झोकून दिलेले आहे यावेळी श्री. बारगजे व डॉ. महेश गोलेकर यांनी विद्यार्थ्यांना अमूल्य असे मार्गदर्शन केले. यासाठी महाविद्यालयाचे सल्लागार डॉ. अरुण भस्मे यांचे अमूल्य असे मार्गदर्शन लाभले.

## वाणगाव फाटा येथे श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**वादळवार्ता/बीड**

बीड (प्रतिनिधी):- येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी संत महात्म्यांच्या आशिर्वादाने आणि वै.रामहारी बाबा) यांच्या संकल्पनेतून साकार झालेला भव्य दिव्य सांप्रदायाची पंरपरा लाभलेला जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त दि.20 ते 27 मार्च या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.




या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात पहाटे 4.00 ते 6.00 काकडा भजन, सकाळी 7.00 ते 10.00 गाथा पारायण, 10.00 ते 12.00 जगद्गुरू संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी 2.00 ते 4.00 संत तुकाराम महाराज चरित्र, सायंकाळी 4.00 ते 5.00 ज्ञानेश्वरी प्रवचन, 5.00 ते 6.00 हरिपाठ, रात्री 9.00 ते 11.00 हरिकिर्तन होईल.मगळवार 26 .3 रोजी सायंकाळी निवृत्ती महाराज इदोरीकर. यांचे हरिकिर्तन होणार असून या सप्ताहाची सांगता बुधवार दि.27 मार्च रोजी सकाळी भव्य दिव्य 10.00 ते 12.00 ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे जगद्गुरू संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळ्या निमित्त व बीजेच्या किर्तनाने होईल. त्यानंत महाप्रसाद होणार आहे. तरी या सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी वानगाव बोरगाव गोगलवाडी रौळसगाव यांनी केले आहे.

# उमरी जलजीवन चे काम बोगस केल्याने उमरीकरांना पाण्यासाठी आली भटकंतीची वेळ

### करोडो रूपये खर्चून ही पाईपलाईन पूर्ण नाही

### पुढारी, अधिकारी,गुत्तेदार यांच्यासाठी जलजीवन ठरले

**वादळवार्ता / माजलगाव**

जलगाव - तालुक्यातील उमरी येथे गेल्या एक वर्षापासून जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाईपलाईनचे काम चालू आहे. ते काम पूर्ण होण्या अगोदरच अनेक ठिकाणची पाईपलाईनची तुटफुट झाली आहे. तर या कामावर करोड रुपये खर्च करूनही उमरीकरांना पाण्यासाठी भटकंतीची वेळ आली आहे. पुढारी, अधिकारी, गुत्तेदार यांच्यासाठी जल जीवन योजना कुरण ठरली आहे. या कामासाठी संबंधित गुत्तेदारवर पुढारी, अधिकारी यांचा वचक नसल्याने संबंधित गुत्तेदार मस्तावलेपणाने वागत आहे .अर्धवट कामावर करोडो रुपये उचलले आहेत. बोगस केलेल्या पाईपलांची चौकशी करून संबंधित अधिकारी, गुत्तेदारावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी गावातील ग्रामस्थांनी केली आहे. माजलगाव तालुक्यात गेल्या वीस वर्षांपूर्वी जल स्वराज्य योजना अवघ्या तीस लाखांमध्ये पूर्ण झाली होती याच कामासाठी उमरी येथील जलजीवन योजनेअंतर्गत माजलगाव धरणातून उमरी येथे पाईपलाईन द्वारे पाणी आणण्यासाठी सुमारे चार कोटी रुपये खर्च होत आहे. हे चार कोटी रुपये पाण्यात जाणार असल्याचे दिसून येत आहे.जलजीवन योजनेला एक वर्ष होऊनही साधी संबंधित गुतेदाराला उमरी ते माजलगाव धरण पाईपलाईन करता आली नाही ज्या



ठिकाणी झाली त्या ठिकाणची ही पाईपलाईन अनेक ठिकाणी तुटलेली आहे. तर काही ठिकाणी उघडी आहे तर संबंधित गुत्तेदाराने जलकुंबासाठी गावांमध्ये जागाही उपलब्ध केली नसून नुसती पाईपलाईन करण्यावर सपाटा लावला होता तोही पाईपलाईन करण्याचे काम बंद करून आज रोजी वर्ष होऊनही पाईपलाईन पूर्ण नाही तर धरणात अर्धवट विहीर खोदली आहे. विहिरीवर जायलाही रस्ता नाही तरीही जलजीवन योजना साठी खर्च होणारे करोडो रुपये पाण्यात जाणार आहेत. करोडो रुपये खर्च करून ही उमरीकरांना पाण्यासाठी भटकंतीची वेळ आली आहे लवकरच अर्धवट राहिलेली पाईपलाईन संबंधित गुत्तेदारांनी करावी नसता लोकशाही मार्गाने महिला, पुरुषाला घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा गावातील ग्रामस्थांनी दिला आहे.

चार दिवसात पाईपलाईन ची अर्धवट राहिलेले काम पूर्ण करू संबंधित गुत्तेदारांनी केलेले अर्धवट काम हे चार दिवसात गुत्तेदारांनी केले नाही तर मी माझे कर्मचारी पाठवून ज्या ठिकाणी पाईपलाईन तुटली आहे किंवा ज्या ठिकाणी पाईपलाईन अडवली आहे त्यांना बोलून ही पाईपलाईन पुर्ववत करण्याचा प्रयत्न करील व कामास विलंब लावल्यामुळे संबंधित गुत्तेदाराला दंड आकारण्यात येईल

-सुनील धाबेकर
उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा, बीड

१३ महिने होऊन ही पाईपलाईन पूर्ण नाही जलजीवन योजनेच्या कामास सुरुवात होऊन १३ महिने पूर्ण होऊनही संबंधित गुत्तेदाराला साधी पाईपलाईन ही पूर्ण करता आली नसल्याने जालिंदर डावकर हा गुत्तेदार किती निष्काळजी पणाने काम करतो आसे दिसत आहे.

\- - - - - -

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )